# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# Savitribai Phule Pune University

(Formerly Pune University)
Ganeshkhind, Pune - 411007


शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)
गणेशखिंड, पुणे – ४११००७
दुरध्वनी क्रमांक : ०२०- २५६२११८८/८९
ई-मेल : affiliation@pun.unipune.ac.in
संकेतस्थळ : www.unipune.ac.in

Academic Section (Affiliation Unit)
Ganeshkhind, Pune -411007
Phone : 020-25621188/89
Email : affiliation@pun.unipune.ac.in
Website: www.unipune.ac.in


संदर्भ क्रं. सीए/ 800

दिनांक : 14/07/2026

प्रति,
**मा. अध्यक्ष/सचिव,**
ऑरिओल एज्युकेशन फौडेशन,
प्राईड अॅक्वार्ड, ७७ वा मजला, रेनबो हाउसिंग सोसायटी,
बाणेर, पुणे ४११०४५

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२६–२०२७ साठी नवीन व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालय /परिसंस्थेच्या पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणाबाबत......**

संदर्भ : १. आखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे मान्यता पत्र (Letter of Approval) संदर्भ क. F.No. Western/1-46209841352/2026/ EOA, Dt. 05.05.2026

२. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण, शासन निर्णय क. मान्यता–२०२६/प्र.क. ५५०/ई–१७०७५५१/तांशि–४, दि. ०७ जुलै, २०२६

महोदय,

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली व उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या सदंर्भिय आदेशान्वये पुढील रकान्यात नमूद केलेल्या पदवी अभ्यासक्रमाच्या आपल्या संस्थेच्या **नवीन महाविद्यालय/परिसंस्थेस** 'कायम विनाअनुदानित तत्वावर' शैक्षणिक वर्ष **२०२६–२०२७** साठी मान्यता देण्यात आलेली आहे. प्राप्त आदेशानुसार सदरहू महाविद्यालय/परिसंस्थेस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०८ मधील तरतूदी तसेच उपरोक्त शासन आदेशातील अटी व शर्तीच्या आणि विद्यापीठ अनुदान आयोग/संबंधित शिखर संस्था/परिषद/नियामक मंडळ/प्राधिकरण व भारत सरकार, महाराष्ट्र शासन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचेकडून वेळोवेळी विहित आणि निर्गमित करण्यात आलेले नियम, आदेश, परिनियम, अध्यादेश इत्यांदीमधील तरतूदींच्या अधीन राहून तसेच तज्ञ समितीच्या अहवालातील अटी व शर्तीची पूर्तता सदरचे पत्र निर्गमित झाल्यापासून तीन महिन्याच्या आत पूर्ण करण्याच्या अटीवर पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देण्यात येत आहे.

| अ. क्र. | महाविद्यालय/परिसंस्थेचे नाव व ठिकाण | विद्याशाखा : वाणिज्य व व्यवस्थापन अभ्यासक्रमः | विद्यार्थी प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १. | ऑरिओल एज्युकेशन फौंडेशन ऑरिओल स्कुल ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, ११६/३, अंबी, ता.मावळ, जि. पुणे ४१०५०७ | १) एम.बी.ए. | १८० (तुकडी क १, २ व ३) |

आपणांस पुढे असेही कळविण्यात येते की, उपरोक्त अभ्यासक्रमास आवश्यक अर्हताधारक संचालक, संचालक—शारीरिक शिक्षण, ग्रंथपाल, अध्यापक व अध्यापकेतर कर्मचारी यांची नियुक्ती करणे तसेच आवश्यक संविधानिक व असंविधानिक समित्यांची स्थापना करणे, निधी स्थापित करणे व ठेवणे आपल्या संस्थेवर/महाविद्यालय/परिसंस्थेवर बंधनकारक राहील.

तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे मान्यता पत्र व उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णयानुसार नवीन व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालय ज्या ठिकाणी स्थापन झाले आहे, त्याच जागेवर कार्यरत असणे अनिवार्य असून याबाबतची वस्तुस्थिती विपरीत आढळल्यास सदर प्रथम संलग्नीकरणाचे पत्र रद्द करण्याबाबतची पुढील आवश्यक ती विहीत प्रशासकीय प्रक्रिया सुरू करण्यात येईल.

उक्त रकान्यात नमूद अभ्यासक्रमांबाबत संलग्नीकरणाचे **नूतनीकरण/नैसर्गिकवाढ** संदर्भातील प्रस्ताव **दिनांक ३० सप्टेंबर, पूर्वी** सादर करणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

कळावे,

आपला,

(प्रदिप कोळी)
उपकुलसचिव
(अतिरिक्त कार्यभार)

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

१. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई — ४०००३२
२. मा. सहसचिव, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई — ४०००३२
३. मा. उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई — ४०००३२
४. मा. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र शासन, पत्र पेटी क्र. १९६७, ३ महापालिका मार्ग, एल्फिन्स्टन टेक्निकल हायस्कूल बिल्डिंग, मुंबई — ४००००१
५. मा. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, ४१२—ई, शिवाजीनगर, पुणे —४११ ०१६
६. मा. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, महाराष्ट्र शासन, गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक कॅम्पस, सामनगाव रोड, नाशिक—४२२१०१
७. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
८. मा. वित्त व लेखा अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ
९. मा. आय. टी. मॅनेजर, प्रस्तुत विद्यापीठ
१०. मा. उपकुलसचिव, परीक्षा समन्वय विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
११. मा. उपकुलसचिव, परीक्षा विभाग, १, २, प्रस्तुत विद्यापीठ
१२. मा. उपकुलसचिव, पदवी प्रमाणपत्र विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
१३. मा. उपकुलसचिव, छाननी व तालिनीकरण कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ
१४. मा. उपकुलसचिव, शैक्षणिक प्रवेश विभाग, प्रस्तुत विद्यापीठ